नि.दि.दावा क्र. २४/२००६
निशाणी क्र. ११९ पुढे सुरु...

प्रतिवादी क्र. १ ते ४ व ६ ते १४ तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा शपथेवर उलटतपास वादींतर्फे अधिवक्ता श्री. एस. एम. बेळगांवकर यांचेकडून पुढे सुरू....

१६. हे खरे की, प्रतिवादी क्र. १५ हे गेल्या ५० वर्षांपासून बेळगाव येथे वास्तव्यास आहेत. हे खरे नाही की, दि. ०१/१२/१९८३ रोजीच्या कराराद्वारे माझ्या वडिलांनी वाद मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा मुळ वादी यास देवून त्यावरील आपला कुळ हक्क सोडून दिला आहे. हे खरे नाही की, सन १९८३ पासून वाद मिळकतीवर पूर्वी मयत वादी व त्याच्यानंतर त्याचे वारस यांचा प्रत्यक्ष कब्जा व ताबा आहे. हे खरे नाही की, वाद मिळकतीमधील १० गुंठे क्षेत्रात वादी हे नाचणा हे पिक घेतात व उर्वरित जमिनीत ते गवताचे पिक घेत असून त्यामध्ये ते त्यांची जनावरे चारतात. हे खरे नाही की, वादींनी वाद मिळकतीमध्ये वेगवेगळी झाडे लावली आहेत. हे खरे नाही की, सन १९८३ पासून वादी हे सातत्याने वाद मिळकतीच्या प्रत्यक्ष कब्जात असल्यामुळे वादी हे वाद मिळकतीचे प्रतिहक्काने मालक झाले आहेत. हे खरे नाही की, वाद मिळकतीच्या ७/१२ च्या उता–यास असलेल्या माझ्या वडिलांच्या नावाच्या व आमच्या नावाच्या नोंदी हया पोकळ आहेत. हे खरे नाही की, वाद मिळकतीतील वादीचा कब्जा व हितसंबंध मी प्रतिवादी क्र. १५ सोबत संगनमत करुन नाकारत आहे.

१७. सन १९६९ च्या सुमारास माझ्या वडिलांनी ३ एकर ३५ गुंठे जमिनीपैकी माझे काका अब्दूल गनी फकीर यांना त्यांच्या हिश्श्याची जमिन दिली असल्याचे माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील कथनास अनुसरुन माझे सांगणे की, त्यावेळी माझ्या वडिलांनी माझ्या चुलत्यांना २ एकर जमिन दिली होती. याबाबत कोणताही दस्त त्यावेळी झाला नव्हता. जमिनीच्या मूळ मालकाने माझ्या चुलत्यांना कुळ

म्हणून त्या जमिनीची खरेदी दिली आहे. याबाबतचा खरेदीखताचा दस्त माझ्या चुलत्याकडे आहे. हे खरे नाही की, माझे वडिल त्यांच्या हयातीत वाद मिळकत कसत असल्याबाबत व त्यांच्या पश्चात आम्ही प्रतिवादी क्र. १ ते १४ हे कुळ म्हणून वाद मिळकतीची वहिवाट करीत असल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, वाद मिळकतीमध्ये आम्ही भात, नाचणा, गवत वगैरे पिके घेत असल्याबाबत तसेच या जमिनीत आम्ही वेगवेगळया झाडांची लागवड केल्याबाबत खोटे सांगत आहे.

प्रश्न– तुमचे वडिल जर इतक्या प्रदिर्घ काळापासून वाद मिळकतीत कुळ म्हणून होते तर त्यांनी त्याच वेळी वाद मिळकतीची कुळ म्हणून खरेदी का करुन घेतली नाही ?

उत्तर – दि. ०१/०४/१९५७ रोजी वाद मिळकतीचे मूळ मालक हे सज्ञान नव्हते म्हणून त्यावेळी खरेदी होवू शकली नाही.

१८. वाद मिळकतीचे मूळ मालक हे केव्हा सज्ञान झाले हे मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, जमिनीचे मूळ मालक जे या दाव्यात प्रतिवादी क्र. १५ म्हणून सामिल आहेत त्यांनी याप्रकरणात त्यांचे स्वतंत्र बचावपत्र दाखल केला आहे. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १५ चे सध्याचे वय ७७ वर्षे इतके आहे. त्याचे वय आजमितीस ६० ते ६५ वर्षे इतके असावे. हे खरे नाही की, वाद मिळकत मुळातच माझ्या वडिलांच्या अथवा आम्हा प्रतिवादी क्र. १ ते १४ यांच्या प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत नसल्याने माझ्या वडिलांनी अथवा आम्ही प्रतिवादींनी जमिनीच्या मूळ मालकास कुळ हक्काने वाद मिळकत आमच्या लाभात खरेदी करुन देण्याविषयी नोटीस पाठविली नव्हती. हे खरे नाही की, वाद मिळकतीवरील आम्हा प्रतिवादींचा कुळ हक्क फार पूर्वीच म्हणजे मूळ मालक सज्ञान झाल्यापासून दोन वर्षानंतर संपूष्टात आला आहे. हे खरे नाही की, वाद मिळकतींशी वादींचा कोणताही संबंध नसल्याचे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, मी खोटया मजकुराच्या पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. हे खरे नाही की, वादीचा दावा व

दाव्यातील मागणी खोटी असल्याचे मी खोटे सांगत आहे.

**उलटतपास पूर्ण....**

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष,

Amrit Chandrakant Birajdar

Digitally signed by Amrit Chandrakant Birajdar
Date: 2019.08.14 13:38:52 +0530

(अमृत चं. बिराजदार)

दिनांक: २५.०७.२०१९

दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. V.G. Kamble, L. G. Stenographer. |
| Name of Court | Shri. A. C. Birajdar,<br>Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Chandgad. |
| Date of Dictation | 25/07/2019 |
| order signed by the P. O. on | 25/07/2019 |
| order uploaded on | 25/07/2019 |